# प्रकरण पहिले

## प्रकरण पहिले

# बॅ. पी. जी. पाटील — प्रारंभीचे जीवन

महाराष्ट्राच्या इतिहासात २० व्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या अनेक सामाजिक व शैक्षणिक चळवळी उभ्या राहिल्या. त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेली शिक्षण चळवळ महत्त्वाची आहे. त्यांनी शिक्षण प्रसाराचे जे महान कार्य केले, त्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडून आले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेले शिक्षणप्रसाराचे काम पुढील काळात एखाद्या विशाल वटवृक्षाप्रमाणे सर्व महाराष्ट्रभर विस्तारीत गेले. त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यशाळेत तयार झालेल्या त्यांच्या निष्ठावान विद्यार्थी रयतसेवकांचा फार मोठा हातभार आहे. अशा रयतसेवकांमध्ये बॅ. पी. जी. पाटील यांचे नाव आवर्जून घेतले पाहिजे. रयत शिक्षण संस्थेच्या सेवाकार्यात राहून त्यांनी ट्युटर, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थेचे सचिव, शिवाजी विद्यापीठ कुलगुरू व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य अशी विविध पदे भूषविली पण त्या पदावरच ते अडकून राहिले नाहीत. आपल्या गुरूवर्याप्रमाणेच त्यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्यास वाहून घेतले होते. एक प्रगाढ बुद्धीचा ज्ञानोपासक, प्रभावी वक्ता, निस्वार्थी रयत सेवक व कुशल प्रशासक म्हणून ते सर्व महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास होणे भावी पिढीच्या दृष्टीने गरजेचे होते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करीत असताना तत्पुर्वीची महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती समजून घेणे गरजेचे आहे.

### महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात होवून गेलेल्या विचारवंतांचा व समाजसुधारकांचा आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचा वाटा आहे. म. जोतीबा फुले, न्या. रानडे, आगरकर, लोकहितवादी, ना. गोखले, छ. शाहू महाराज, महर्षि विठ्ठल

रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक समाजसुधारकांनी केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्रात याकाळात वैचारीक प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. तत्कालीन समाजाचे निरनिराळे प्रश्न हाती घेऊन महाराष्ट्रात या कालखंडात सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या. त्यामुळे सर्व महाराष्ट्र ढवळून निघाला. वर्षानुवर्षे चालत आलेल्या वर्णश्रेष्ठत्व व जातीश्रेष्ठत्वाच्या कल्पनेला तडे गेले. धर्माच्या नावाखाली चालत आलेल्या अनिष्ट प्रथांना, रुढींना व अंधश्रद्धांना काही प्रमाणात का होईना बाजूला सारून, समाजात बुद्धीवादी दृष्टीकोनातून विचार केला जाऊ लागला व या वैचारीक मंथनातून महाराष्ट्र एका नव्या दिशेने जाऊ लागला हीच आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीची सुरूवात होती.

पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुदेवतावाद व चुकीच्या धर्मश्रद्धात गुंतलेल्या आणि जातीपातीच्या कडक कुंपणात अडकून पडलेल्या सामान्य, गरीब व मागासलेल्या थरातील लोकांची अस्मिता खऱ्या अर्थाने जागृत करण्याचे काम महाराष्ट्रात म. जोतीबा फुलेंनी केले. शहर संस्कृतीपुरती मर्यादित असलेली समाजसुधारणेची चळवळ म. फुले यांनी खेड्यातील झोपडीपर्यंत नेली. त्यांची चळवळ स्त्रिया, मुले, अस्पृश्य, गोरगरीब, शेतकरी, कामगार या सर्वांना सुधारण्यासाठी होती. त्यांच्यासाठी म. फुले यांनी केलेले योगदान, घेतलेले श्रम व सनातनी मंडळीविरूद्ध दिलेली झुंज ही निकराची व अभुतपूर्व होती. हिंदु समाजातील वर्णव्यवस्था आणि जातीप्रथेविरूद्ध त्यांनी बंडाचा झेंडा उभारला. राजा राममोहन रॉय प्रमाणेच म. फुले हे भारतातील प्रबोधनाच्या चळवळीचे अग्रदूत ठरतात.[१]

म. फुले यांनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजाची' स्थापना करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. वर्षानुवर्षे स्वत:चे सत्व व अस्मिता हरवून बसलेल्या कनिष्ठ समाजात त्यांनी नवजागृती घडवून आणण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे या समाजाला आपल्यातील उणिवांची जाणीव होऊन त्यांनी प्रगतीच्या दिशेने हळूहळू वाटचाल सुरू केली. बहुजन समाजाच्या प्रबोधनाची त्यांच्या उत्थापनाची

सुरूवात म. फुल्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रात सुरू झाली. या समाजाला आत्मावलोकन करण्यास शिकविणारा व त्या समाजाला स्वसामर्थ्याची जाणीव करून देणारा पहिला महापुरूष म्हणजे म. जोतीबा फुले होय. समाज सुधारणेसाठी म. फुलेंनी आपले जीवन आचरणपूर्वक समर्पित केले.[२]

म. फुले यांच्या निधनानंतर थंडावलेल्या या सामाजिक चळवळीला चालना देण्याचे कार्य छ. शाहू महाराजांनी केले. वेदोक्त प्रकरणाने छ. शाहू महाराजांचा स्वाभिमान डिवचला गेला. आपण छत्रपती व क्षत्रिय असूनही आपणास उच्चवर्णीय सनातनी ब्राम्हणांनी आपणास शूद्र लेखले व आपली अवहेलना केल्याचे शाहू महाराजांना सहन झाले नाही. माझ्यासारख्या छत्रपतीला उच्चवर्णियांकडून जर ही वागणूक मिळत असेल तर सामान्य माणसांची व अस्पृश्यांची काय अवस्था असेल या सामाजिक वैगुण्याची जाण छ. शाहू महाराजांना झाली. म्हणून त्यांनी सत्यशोधक चळवळीचे पुनर्जीवन केले व १९११ मध्ये “कोल्हापूर शाहू सत्यशोधक समाज” स्थापन केला.[३]

छ. शाहू महाराजांच्या काळात ही सामाजिक चळवळ अधिक प्रभावशाली बनली. तिला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी इ.स. १९१२ ते १९२२ पर्यंत जाती निर्मूलन, सामाजिक समता व बहुजन समाजासाठी शिक्षणाचा प्रसार इत्यादी क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. छ. शाहू महाराजांची कामगिरी व त्यांची सत्ता यांचा ही चळवळ वाढविण्यासाठी खूपच उपयोग झाला. केवळ शिक्षणाच्या अभावामुळेच या बहुजन समाजाची पिछेहाट झाली होती. हे म. फुले यांनी जसे ओळखून या बहुजन समाजाला, स्त्रियांना व अस्पृश्यांना शिक्षण देण्यासाठी शाळा उघडल्या; तेच कार्य शाहू महाराजांनी केले. त्यांनी सर्व जातीधर्मांच्या मुलांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे, असे ठासून सांगून आपल्या संस्थानात, या मुलांच्यासाठी शाळा काढल्या व मुलांना राहण्यासाठी वसतिगृहे काढली. त्यामुळे सर्व जातीतील मुलांच्यात हळूहळू शिक्षण प्रसार होवू लागला. हे शिक्षण घेऊन सुविद्य झालेल्या तरूण मंडळीनींच पुढील काळात या

सामाजिक चळवळीचे नेतृत्व करून ती महाराष्ट्रभर पसरविली. या तरूण मंडळीत भास्करराव जाधव, जेधे बंधू, आण्णासाहेब लठ्ठे, म. ग. डोंगरे, हरिभाऊ चव्हाण, गणपतराव कदम, श्रीपतराव कदम, एस. टी. कांबळी, बाळासाहेब मोरे, केशवराव विचारे, कर्मवीर भाऊराव पाटील इ. शेकडो कार्यकर्ते होते. छ. शाहू महाराजांच्या मृत्युनंतर सत्यशोधक चळवळीचे कार्य प्रभावीपणे व अखंडीत चालू ठेवण्याचे कार्य याच नेत्यांनी केले. समाजातील निरनिराळे प्रश्न हाती घेऊन ते सोडविण्यासाठी या नेत्यांनी चळवळी उभ्या केल्या. म. फुले व छ. शाहू महाराज यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन, विसाव्या शतकाच्या पुर्वार्धात तीन सामाजिक चळवळीचे प्रवाह पुढे आले. ते म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेली शिक्षण प्रसाराची चळवळ, दुसरी केशवराव जेधे यांच्या नेतृत्त्वाखाली चालवलेली ब्राम्हणेत्तर चळवळ व तिसरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेली दलित चळवळ होय. या तिन्ही चळवळींनी महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलून टाकला.[४]

म. फुले व छ. शाहू महाराज यांनी बहुजन समाजाच्या उद्धाराची गुरूकिल्ली 'शिक्षण' आहे हे ओळखून शिक्षण प्रसाराचे कार्य केले. परंतु जादुची कांडी फिरवल्याप्रमाणे शिक्षणाचा प्रसार सर्व महाराष्ट्रभर व सामान्य माणसापर्यंत व खेडोपाडी पोहचणे अवघड होते. ते कार्य बहुजन समाजाच्या दृष्टीने नितांत गरजेचे व आवश्यक होते. हे कर्मवीर भाऊराव पाटलांनी ओळखून त्यांनी शिक्षण प्रसाराला आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले. महाराष्ट्रात या काळात सर्व थरातील लोकांच्यासाठी भाऊराव पाटलांनी केलेला शिक्षणप्रसार हा महाराष्ट्राच्या प्रगतीचे एक अविभाज्य अंग आहे.

### महाराष्ट्रातील शिक्षण प्रसार व कर्मवीर भाऊराव पाटलांचे कार्य :

भारतात आणि महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षण व भौतिक विद्यांच्या अभ्यासाला ब्रिटिशकाळापासून प्रारंभ झाला. या शिक्षणामुळे महाराष्ट्र तसेच भारतातील सामाजिक जीवनात एक प्रकारचे परिवर्तन घडून

आले. धर्म प्रसारासाठी आलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणेच एतद्देशीय समाज सुधारकांनीही शिक्षणासाठी प्रयत्न केल्याचे आढळतात.

इ.स. १८१३ मध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांची पहिली तुकडी महाराष्ट्रात आली. गॉर्डन हॉल हा त्यांचा प्रमुख होता. त्याने खेतवाडी व गिरगांव येथे इ.स. १८१३ ते १८१८ या काळात शाळा सुरू केल्या. गॉर्डन हॉल प्रमाणेच फेअर बॅंक, ज्युलिया बिसेस, डॉ. केंटाईल इत्यादी मिशनऱ्यांनी अमाप कष्ट घेऊन शिक्षणप्रसाराचे व समाजसेवेचे कार्य केले. इ.स. १८१८ ते १८५७ या काळात या मिशनऱ्यांनी अनेक शाळा काढल्या.[५] अहमदनगर येथे महाविद्यालय, आठ प्रचार केंद्रे, ७६ उपकेंद्रे, अनेक दवाखाने सुरू केलेले आढळतात. परंतु मिशनऱ्यांच्या शिक्षणप्रसाराला, समाजोपयोगी कार्याला धर्मप्रसाराची पार्श्वभूमी होती. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हा त्यांचा एकमेव उद्देश होता. त्यामुळे गोरगरीब व कनिष्ठ जातीतील अनेक जणांना त्यांच्या मदतीचा उपयोग होऊन त्यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला तरी मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराचा उद्देश उघड झाल्यावर येथील समाजाने धर्मांतराच्या भितीने त्यांच्या समाजोपयोगी सेवेला व शिक्षणप्रसाराला प्रतिसाद दिला नाही.

मुंबई इलाख्यात येथील काही समाजसुधारकांनी ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मदतीने काही प्रमाणात शिक्षण प्रसार करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. १८१५ मध्ये मुंबई येथे एल्फिस्टनच्या पुढाकाराने व स्थानिक नेत्यांच्या सहकार्याने 'बॉंबे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना झाली होती. तसेच जगन्नाथ शंकरशेठ यांनी १८२२ मध्ये 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापन केली. या संस्थेने मुंबईत व मुंबईबाहेर काही शाळा काढल्या. त्यात बाळशास्त्री जांभेकर व सदाशिव छत्रे यांचे सहकार्य मिळाले. १८२४ मध्ये मुंबईत इंग्रजी शाळेची स्थापना झाली. पुढे त्याच शाळेला 'एल्फिस्टन हायस्कूल' नाव देण्यात आले. तसेच पुण्यात १८५४ मध्ये सायन्स कॉलेजची स्थापना झाली तर १८५७ मध्ये मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. पुण्यामध्ये आण्णासाहेब कर्वे यांनी स्त्री

शिक्षणाचे कार्य सुरू केले होते. अशा तऱ्हेने १९ व्या शतकात ब्रिटिश सरकारच्या सहकार्याने व स्थानिक नेत्यांच्या प्रयत्नांनी शिक्षण प्रसाराचे कार्य काही प्रमाणात सुरू होते.[६]

या काळातील शिक्षण प्रसारात बहुजन समाजाच्या दृष्टीने काही मर्यादा होत्या. पहिले म्हणजे या शाळा व शिक्षणसंस्था पुण्या–मुंबईसारख्या मोठ्या शहरात निघाल्या होत्या व दुसरी मर्यादा म्हणजे या शिक्षणाचा लाभ उच्च वर्णीय व श्रीमंत वर्गातील लोकांनाच होत होता. त्यामुळे खेड्यापाड्यातील अस्पृश्य व मागासवर्ग, गोरगरीब व स्त्रियांना या शिक्षणाचा काहीही फायदा होत नव्हता व त्यांनाही या गोष्टीचे काही वाटत नव्हते. त्यांच्या शिक्षणासाठी केले पाहिजेत असे प्रयत्न होत नव्हते. त्यामुळे वर्षानुवर्षे हा समाज मागे राहिला होता. यातून मार्ग काढण्याचा पहिला प्रयत्न म. जोतीबा फुले यांनी केला. त्यांनी बहुजन समाजातील गोरगरीब, शुद्रातिशुद्र व स्त्रियांसाठी शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून प्रयत्न केले. ही एका नव्या परिवर्तनाची सुरूवात होती. तीच मूल्ये डोळ्यासमोर ठेऊन छ. शाहू महाराजांनी ही शिक्षण प्रसाराची चळवळ वाढविली. तर अवघ्या महाराष्ट्रात हे शिक्षण प्रसाराचे कार्य व्हावे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी भगिरथ प्रयत्न केले. समाजातील गोरगरीब, अस्पृश्य, स्त्रिया किंबहुना सर्व जाती धर्मातील मुलामुलींना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी केले. शहरापुरते मर्यादित असणारे शिक्षण खेड्यापाड्यात अगदी झोपडीपर्यंत नेण्याचे कार्य त्यांच्या हातून झाले. खऱ्या अर्थाने भाऊरावांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण नेल्याचे दिसते.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य :**

म. फुले व छ. शाहू महाराज यांच्या विचारसरणीचा प्रभाव कर्मवीर भाऊराव पाटलांच्यावर होता. फुलेप्रणीत सत्यशोधक चळवळीचे ते कृतीशील कार्यकर्ते होते. सत्यशोधक समाजाचे अस्पृश्यता निवारण, जातीभेद निर्मूलन, स्त्री जागृती व सामाजिक समता प्रस्थापिणे हे कार्य करण्यासाठी सर्व महाराष्ट्रभर फिरत असताना भाऊरावांना अज्ञान, अंधश्रद्धा,

रूढी, परंपरा, भ्रामक समजूती व प्रचंड धर्मभोळेपणा यात अडकलेला व दारिद्र्याने पिडलेला समाज दिसून आला. या सर्वांतून जर समाजाला सोडवायचे असेल तर या समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे. याची जाण भाऊराव पाटील यांना झाली व त्यांनी या बहुजन समाजाच्या शुद्रातिशुद्रांच्या, स्त्रीवर्गाच्या व गोरगरीबांच्या शिक्षण कार्याला वाहून घेतले.[७]

काले (ता. कराड, जि. सातारा) येथे भरलेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेत ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली व शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरूवात केली. पुढे या रयत शिक्षण संस्थेचे स्थलांतर सातारा येथे झाले. तेथे त्यांनी १९२४ मध्ये 'छत्रपती शाहू बोर्डींग हाऊसची' स्थापना केली. वसतिगृहयुक्त शाळा ही त्यांच्या शिक्षणप्रसाराची योजना होती. सर्व जाती धर्माच्या, गोरगरीब विद्यार्थ्यांचा एकाच वसतिगृहात समावेश हे त्यांच्या योजनेचे सुत्र होते. त्यांच्या वसतिगृहात सर्व जाती—जमातीची मुले एकत्र राहत होती. एकत्रच जेवत होती व एकत्रच शिक्षण घेत होती. कर्मवीरांनी आपल्या शिक्षण कार्यात शिक्षण प्रसार, जातिभेद निर्मूलन व सामाजिक समता या त्रिसुत्रांचा समन्वय साधला होता. अठरापगड जातीतील, स्पृश्य — अस्पृश्य अशा सर्व मुलांना एकाच वसतिगृहात ठेऊन एकत्र जेवायला लावण्याचा सर्व भारतातील हा पहिला प्रयोग होता. त्यांनी सर्व जाती—जमातीमधील भिंती पाडून टाकून सर्वांना एकत्र राहायला लावण्याचा व बरोबरीने शिक्षण देण्याचा धाडसी प्रयत्न केला. हा उपक्रम त्यांनी ज्या काळात केला त्या काळात तो प्रयत्न केवळ धाडसीच नव्हता तर क्रांतीकारीवादी होता.[८]

कर्मवीरांचा शिक्षण प्रसार हा नुसता साक्षरता प्रसार नव्हता. समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून त्यांनी शिक्षणाकडे पाहिले. त्यांनी शिक्षणाची एक नवी चौकट उभी केली की, जी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही उपयोगी ठरली. "शिक्षण घ्या आणि शहाणे व्हा" हा कर्मवीरांचा पहिला मंत्र होता. "कष्ट करा, घाम गाळा व शिक्षण घ्या" हा त्यांचा मंत्र साधनेचा मार्ग त्यांनी दाखवला. अज्ञानाच्या अंधारात चाचपडणाऱ्या बहुजन

समाजाला शिक्षित करणे, हे शिक्षण जातीधर्माच्या मर्यादा ओलांडून बंधूभाव वाढवणाऱ्या वसतिगृहांच्या माध्यमातून देणे, स्वावलंबनाच्या आधारे ते घेऊन श्रमप्रतिष्ठा रूजवणे व मिळालेल्या ज्ञानाचा समाजासाठी उपयोग करण्याचे असिधारा व्रत त्यांनी व्रतस्थ, निष्काम, सेवाभावी वृत्तीने चालवून समर्पित जीवनाचा आदर्श निर्माण केला.[९]

कर्मवीरांनी १९१९ मध्ये लावलेल्या इवल्याशा बिजाचा आज विशाल असा वटवृक्ष झालेला आहे. सुरूवातीला ३० रूपयांचे वार्षिक बजेट आणि चार विद्यार्थी यांच्यासह सुरू झालेल्या या रयत शिक्षण संस्थेत आज (इ.स. २००७ मध्ये) चाळीस महाविद्यालये, ४३५ माध्यमिक विद्यालये आहेत.

रयत शिक्षण संस्था म्हणजे शहराबरोबर ग्रामीण भागात पोहोचलेली, सर्व जाती वर्गांना व स्त्रियांना सामावून घेणारी, ती एक प्रभावी व व्यापक शैक्षणिक चळवळ आहे. ग्रामीण भागाच्या कानाकोपऱ्यात विखुरलेल्या नाना जातीधर्माच्या गोरगरीब, स्त्री पुरूषांना ज्ञान देण्याची अपुर्व किमया या संस्थेने केली आहे. महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू, महर्षी वि. रा. शिंदे, महात्मा गांधी अशा अनेक सामाजिक संतांच्या शिकवणूकीचे सार घेऊन आणि सद्‌गुरू गाडगे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संवाद साधित कर्मवीरांनी महाराष्ट्रातील शिक्षण परंपरेचा प्रवाह शंभर वर्षांनी पुढे नेला आहे.[१०]

कर्मवीरांच्या या शैक्षणिक चळवळीतून बहुजनात शिक्षण प्रसार होवून नवे नेतृत्त्व पुढे आले. शिकलेल्यांना नोकऱ्या लागून त्यांचा आर्थिक स्तर उंचावला. शुद्रातिशुद्रांनी शिक्षण घेऊन त्यांच्यात सुशिक्षित पिढी निर्माण झाली. त्यांनी दलित चळवळीला कार्यकर्ते पुरविले. समाजातील सर्व थरातील लोकांना कमीजास्त प्रमाणात नोकरीच्या संधीही निर्माण झाल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षण घेण्याचे फायदे किती व्यापक आहेत हे या लोकांच्या लक्षात येऊन त्यांच्यातील शिक्षण प्रसाराचा वेगही वाढला.

कर्मवीरांचा शैक्षणिक उपक्रम अनेकांना मार्गदर्शक ठरून नंतरच्या काळात महाराष्ट्रात अनेक शिक्षण संस्था उदयास आल्या.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेले शिक्षण प्रसाराचे कार्य विलक्षण वेगाने वाढलेले दिसते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांनीच आपल्या शाखेतून शिक्षण देऊन तयार केलेले, त्यांच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा असलेले व त्यांच्या शिक्षणकार्याला आजन्म वाहून घेणारे निष्ठावंत कार्यकर्ते होय. असे शेकडो कार्यकर्ते कर्मवीर आण्णांनी उभे केले होते. गोरगरीब कुटुंबातील, कनिष्ठ जातीतील, समाजातील सर्व स्तरातील शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना कर्मवीर आण्णांनी अक्षरशः आपल्या खांद्यावरून शिक्षणासाठी सातारला आणले. त्यांच्यासाठी अविश्रांत परिश्रम घेऊन त्यांना शिक्षण दिले. त्यातून काहींना परदेशातही पाठविले. काही डॉक्टर झाले, काही वकील झाले तरी त्यांच्या शिक्षण संस्थेत नोकरीस लागले. या सर्वांनी त्यांच्यासाठी कर्मवीर आण्णांनी घेतलेले कष्ट, केलेला असीम त्याग पाहिलेला होता. त्या संस्कारातून अनेक युवा विद्यार्थी प्रभावित झाले व त्यांनी आण्णांच्या शैक्षणिक कार्याला वाहून घेण्याचे ठरविले. असे अनेक निष्ठावंत कार्यकर्ते आणांच्या हयातीतच निर्माण झाले होते. त्यामुळे ह्या रयत शिक्षण संस्थेचे कार्य आण्णांच्या काळात व नंतरही वेगाने वाढत राहिले. ईस्माईल मुल्लासाहेब, आतारसाहेब, बॅ. पी. जी. पाटील, प्रा. एन. डी. पाटील, आण्णासाहेब मगदूम इत्यादी असंख्य कार्यकर्त्यांनी ह्या संस्थेला मोलाचे योगदान दिले आहे. हे कार्यकर्ते हेच आण्णांचे वारसदार आहेत.[११]

कर्मवीर आण्णांनी स्विकारलेल्या जीवननिष्ठा प्रमाणभूत मानून त्यांनी स्विकारलेल्या या शिक्षण कार्याला आयुष्यभर वाहून घेणारे अनेक वारसदार आण्णांनी उभे केले होते. त्यामध्ये बॅ. पी. जी. पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले पाहिजे. आण्णांचे विचार व कृती यात पूर्णपणे समरस होऊन, रयत शिक्षण संस्था हेच आपले कार्यक्षेत्र मानून, शिक्षण प्रसाराचे कार्य तन्मयतेने करून अधिव्याख्याता पदापासून कुलगुरू पदापर्यंत पदे भूषविलेले बॅ. पी. जी. पाटील हे खऱ्या अर्थाने कर्मवीरांचे मानसपुत्र होते.

आई वडिलांनी जन्म दिला व प्राथमिक शिक्षण दिले परंतु कर्मवीर आण्णांच्या कार्यशाळेत त्यांना घडवले, वाढवले गेले. अगदी आण्णांना हवा तसा त्यांच्या विचारधारेशी समरस झालेला. गोरगरिबांना शिक्षण देण्यासाठी स्थापन झालेल्या रयत शिक्षण संस्थेसारख्या कार्यशाळेच्या शिक्षणकार्यात आयुष्यभर वाहून घेणारा, निस्पृह, नीतीमान, संवेदनशील, गोरगरिबांच्या अडचणींची जाण असलेला एक विद्वान शिक्षण सेवक, रयत कार्यकर्ता बॅ. पी. जी. सरांच्या रूपाने तयार झाला. कर्मवीर आण्णांच्या हयातीत व नंतर या संस्थेची धुरा सांभाळण्याचे बहुमोल कार्य त्यांनी केले. रयत शिक्षण संस्था ही त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनली होती. रयत शिक्षण संस्थेच्या अडीअडचणी त्यांच्या कौटुंबिक अडीअडचणी बनल्या. संस्थेची भरभराट ही त्यांनी आपली मानली व संस्थेच्या विकासासाठी ते आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत तन—मन—धनाने झिजले. सेवानिवृत्त झाल्यानंतरही हे भावबंध दृढच राहिले. पी. जी सरांनी सामाजिक व वैचारिक बांधिलकेच्या भूमिकेतून जे कार्य केले ते महनीय आहे. त्यांची इंग्रजी विषयावर 'मास्टरी' होती. त्यांच्या हाताखाली शिक्षण घेऊन हजारो विद्यार्थी तयार झालेत. जे आज निरनिराळ्या क्षेत्रात उच्च पदावर कार्य करत आहेत. बॅ. पी. जीं. ना राजकारणाची आवड नव्हती, सत्तेची लालसा नव्हती. ते निश्चलपणे ज्ञानदानाचे कार्य करणारे व्यासंगी प्राध्यापक, कुशल प्रशासक, लेखक, कवी व उत्कृष्ट वक्ता होते. महाराष्ट्रातील गोरगरीब रयतेच्या हजारो मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी कष्ट घेतले. ऐपत नसलेल्या गरीब मुलांना 'कमवा व शिका' ही आण्णांनी सुरू केलेली योजना पुढील काळात चालू ठेवून त्यातून नामवंत विद्यार्थी तयार केले. त्यामुळे बहुजन समाजाचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक मागासलेपण कमी होण्यास मदत झाली. मात्र त्यांनी केलेल्या या कामाचा गाजावाजा कधीच झाला नाही. त्यांनीही तो होऊ दिला नाही. म्हणूनच सामान्य रयतेच्या मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या या 'रयतपुत्राच्या जीवन—कार्याचा' सखोलपणे अभ्यास होणे आवश्यक व गरजेचे आहे.

**पाटील कुटुंबाची पार्श्वभूमी :**

बॅ. पी. जी. पाटील यांचे कवलापूर हे गाव सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात येते. एक सामान्य शेतकरी कुटुंब म्हणूनच त्यांच्या घराण्याची त्या गावात गणना होत होती. बॅ. पी. जी. सरांचे आजोबा महादेव पाटील हे कवलापूरात आपली वाडवडिलार्जित शेती करत असत. त्यांची आर्थिक परिस्थिती साधारणच होती. परंतु सदवर्तनी स्वभाव आणि परोपकारी वृत्ती यामुळे गावात त्यांना प्रतिष्ठा व नावलौकीक प्राप्त झाला होता. गावातील अनेकांना ते अडीअडचणीच्या काळात मदत करत असत. गोरगरीब शेतकऱ्यांना औतकाटी, बी–बियाणे यांची मदत करत असत. काही वेळा आर्थिकदृष्ट्या नडलेल्या शेतकऱ्यांना पैशाची गरज भासत असे. अशावेळी ते स्वत: सावकाराला जामीन राहून त्या शेतकऱ्याला कर्ज मिळवून देत असत. शेतकऱ्याच्या मुलीचे लग्न असो अगर एखाद्याचे आजारपण असो अशावेळीही ते उपयोगी पडत. त्यामुळे गावात एक चांगला माणूस म्हणून त्यांची प्रतिष्ठा होती. परंतु पुढील काळात अनेकांनी सावकारी कर्ज परत न दिल्याने जामीन राहिलेल्या महादेव पाटलांना त्या कर्जास जबाबदार धरले गेले. तसेच अनेकांना आर्थिक मदत करूनही ती माघारी न दिल्याने महादेव पाटलांच्यावर पुढील काळात सावकारी कर्ज झाल्याचे दिसून येते. ते कर्ज फेडण्यात त्यांचा बराच काळ गेला. मात्र या आर्थिक दुरावस्थेचा परिणाम त्यांनी आपल्या कौटुंबिक जीवनावर होऊ दिला नाही.[१२]


महादेव पाटील यांना गणपती नावाचा मुलगा होता. त्या मुलाच्या शिक्षणाकडे महादेव पाटील यांनी चांगले लक्ष दिले होते. त्याकाळात मराठा कुटुंबात शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले जात नव्हते. परंतु महादेव पाटील यांनी गणपतीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले होते. त्यावेळी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत शिक्षण झाले की शिक्षकाची नोकरी मिळत होती. त्यामुळे गणपती पाटील यांनी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत शिक्षण पूर्ण केले व

त्यांना आपल्या गावातच प्राथमिक शिक्षकाची नोकरी मिळाली. या घटनेचा महादेव पाटील यांना खूप आनंद झाला. कारण त्यांच्या घराण्यातील नोकरी लागलेला हा पहिलाच मुलगा होता. या गणपती पाटील यांना पुढील काळात सर्व गाव 'मास्तर' म्हणून ओळखत असे. त्यावेळी त्यांना महिना आठ रूपये पगार होता.

गणपती पाटील हे लहानपणापासूनच धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांच्या गळ्यात तुळशीची माळ होती. ते भजन, कीर्तन, आरती यात सहभागी होत असत व स्वत: सुस्वर आवाजात भजन म्हणत असत. शिक्षकाची नोकरी मिळाल्यानंतर त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे व सचोटीने आपल्या कार्याला वाहून घेतलेले दिसते. विद्यार्थ्यांमध्ये ते विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून गणले गेले. शेतीतून येणारे मोजके उत्पन्न व पगार यावर त्यांचा कौटुंबिक खर्च भागवला जात असे. त्याआधारे त्यांनी वडिलांवर असलेले काही कर्जही फेडले. आपल्या वडिलांप्रमाणे त्यांचाही स्वभाव परोपकारी व दुसऱ्याला उपयोगी पडणे अशा वृत्तीचाच होता. गणपती पाटील यांचा विवाह कवठे (किऱ्हाड सिद्धचे) येथील कन्या आक्कुबाई यांच्याशी झाला व या दांपत्त्याच्या पोटीच बॅ. पी. जी. पाटील यांचा जन्म झाला.[१३]

**बॅ. पी. जीं. चे बालपण :**

गणपती पाटील व आक्कुबाई यांना एकंदर पाच अपत्ये झाली. थोरल्या राधाबाई व पार्वतीबाई या दोन मुली होत्या. त्यानंतर तीन नंबरची मुलगी अगदी लहानपणीच वारली. त्यांचे चौथे अपत्य बॅ. पी. जी. पाटील म्हणजेच पांडुरंग गणपती पाटील होय. त्यांचा जन्म ३ जुलै १९२१ रोजी कवलापूर येथे झाला.



या दांपत्त्याला पहिल्या तीन मुलीच होत्या. आपल्या मुलीला मुलगा व्हावा म्हणून आक्कुबाईच्या आईने साऊबाईने पंढरपूरच्या पांडुरंगाला नवस केला होता. तीन मुलींनंतर हा मुलगा नवसाने झाला म्हणून त्याचे नांव पांडुरंग असे ठेवण्यात आले होते. शिवाय या कुटुंबात वारकरी संप्रदयाचे वातावरण होते. पांडुरंग नंतर आक्कुबाईंना रामचंद्र नावाचा आणखी एक मुलगा झाला. बॅ. पी. जी. पाटील यांना दुर्दैवाने आपल्या आईचे मातृप्रेम फार काळ लाभले नाही. त्यांचे वय चार वर्षाचे असतानाच आक्कुबाई मरण पावल्या. त्यामुळे गणपती पाटील यांच्यावर दु:खाची कुऱ्हाड कोसळली. त्याशिवाय या चार मुलांना कसे सांभाळावे हा प्रश्नही गणपती पाटील यांच्यापुढे उभा राहिला होता. यावेळी आक्कुबाईंची आई साऊबाई (त्यांना सर्वजण आऊ असे म्हणत) या मदतीस धावल्या. आक्कुबाई ज्यावेळेस आजारी होत्या व आपण या आजारातून आता जगत नाही याची जाणीव त्यांना झाली. त्यावेळेस त्यांनी आपल्या आईला जवळ बोलावून माझ्या मुलांचा व्यवस्थित सांभाळ कर असे वचन आपल्या आईकडून घेतले व प्राण सोडला. आऊबाईंनीही ते वचन आपल्या कृतीने पाळले व आपल्या नाती व नातवांचा आईच्या ममतेने सांभाळ केला. आऊंबद्दल म्हणजेच आपल्या आजींबद्दल बॅ. पी. जी. पाटील नेहमीच आपल्या व्याख्यानातून उल्लेख करत असत.

महादेव पाटील यांच्यावर झालेले सावकारी कर्ज आपोआपच त्यांचा मुलगा या नात्याने गणपती पाटलांवर फेडण्याची जबाबदारी आली होती. त्याचप्रमाणे पत्नीचे आजारपण व शेतीतील कमी उत्पादन यामुळे सावकारी कर्ज फेडणे अवघड होऊन बसले. अशा कठीण परिस्थितीत आऊबाईंनी स्वत:ची जमीन विकून आपल्या जावयाचे म्हणजे गणपती पाटील यांचे सर्व सावकारी कर्ज फेडले व त्यांच्या मुलांना लहानाचे मोठे करण्यात आपले सर्व आयुष्य खर्च केले.[१५]

पांडुरंग पाटील हे लहानपणापासूनच अतिशय चुणचुणीत, गोरेपान, तेजस्वी डोळे व दिसावयास अतिशय सुंदर होते. त्यांची देहयष्टी बारीक होती परंतु ते अतिशय चपळ व अवखळ होते. लहानपणी त्यांचा स्वभाव अतिशय खोडकर व हट्टी होता. त्यांच्या पायात वाळे व कानात डुल घातलेले व डोक्यावर जरीची टोपी असे. त्यांचे जावळही काही दिवस राखलेले होते. घरातील सर्व लोकांना या पांडुरंगाचा लळा लागलेला होता. लहानपणापासूनच त्यांना सौंदर्याबरोबरच तीव्र बुद्धीमत्ता लाभलेली होती. त्यांच्या लहानपणीच्या आठवणी सांगताना त्यांच्या थोरल्या बहिणी या पांडुरंगाच्या हुशारीबद्दल आवर्जुन माहिती सांगायच्या अशा या पांडुरंगाने पुढील काळात आपल्या अमाप बुद्धीमत्तेच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे नाव मिळविले.[१६]

## बॅ. पी. जी. पाटील यांचे प्राथमिक शिक्षण :

बॅ. पी. जी. पाटील यांचे प्राथमिक शिक्षण कवलापूरच्या मराठी शाळेतच झाले. त्याकाळात वयाच्या सातव्या वर्षी इयत्ता पहिलीत प्रवेश दिला जाई. बालवाडी किंवा अंगणवाडी वगैरे प्रकार नव्हते. गणपती पाटील हे शिक्षक असल्यामुळे त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे जातीने लक्ष दिले. पांडुरंगाला सातवे वर्ष लागल्यानंतर गणपती मास्तरांनी कवलापूरच्या मराठी शाळेत इयत्ता पहिलीमध्ये त्यांचे नाव घातले व त्यांचे शिक्षण सुरू झाले. अल्पकाळातच या मुलाची हुशारी सर्व शिक्षकांना जाणवू लागली. प्रचंड बुद्धीमत्तेची देणगी त्यांना लाभलेली असल्यामुळे इतर मुलांच्या तुलनेने त्यांचा अभ्यास लवकर होत असे. कविता पाठ करणे, पाढे पाठ करणे, गणिते सोडविणे यासारख्या अभ्यासात ते सर्व मुलांच्यात पहिले येत असत. त्यांचे अक्षर मोत्यासारखे सुंदर होते. इयत्ता सहावीपर्यंत ते आपल्या वर्गात नेहमीच पहिले राहिले होते. याकाळात कवलापूरच्या शाळेतील शिक्षक प. वि. चिम[illegible]गावकर व कुलकर्णी मास्तर यांनी त्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसते. या प्राथमिक शाळेच्या काळात पांडुरंग उर्फ बॅ. पी. जी. पाटील यांची मैत्री रघुनाथ निळकंठ गुरूजी, केशव

संकपाळ, मा. सो. कांबळे इत्यादींशी झाली होती. इयत्ता सहावीत असताना त्यांनी 'बालतरंग' या नावाचे हस्तलिखीत मासिक तयार केले होते. याकामी त्यांना शिक्षकांनीही मदत केली होती. या मासिकात मुलांनी लिहिलेलेच छोटे लेख, चित्रे व काव्य यांचा संग्रह करण्यात आला होता. हे हस्तिलिखित पाहून भाऊराव पाटील या मुलाच्या बुद्धिमत्तेबद्दल प्रभावीत झाल्याचे दिसून येते. इयत्ता सहावीपर्यंतचे त्यांचे शिक्षण कवलापूरात झाले.[१७]

**कर्मवीर आण्णांची कवलापूरला भेट :**

इ.स. १९१९ मध्ये कर्मवीर आण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षण प्रसार कार्याला सुरूवात केली व संपुर्ण महाराष्ट्रभर बहुजन समाजाच्या व कनिष्ठ जातीतील मुलांत शिक्षण प्रसारासाठी प्रयत्नशील राहिले. त्यासाठी त्यांनी शेकडो मराठी शाळा काढल्या. गावोगाव फिरले. जात—पात, गरीब—श्रीमंत असा भेदभाव न पाळता ज्यांची शिकण्याची ऐपत नाही, परंतु बुद्धीमान आहेत अशा लहान मुलांना त्यांनी सातारला आणले व त्यांना आपल्या वसतिगृहात ठेवून त्या मुलांचे शिक्षण पुर्ण केले. ही सर्व मुले निरनिराळ्या जातीची व धर्माची असत. परंतु आण्णांच्या वसतिगृहात ती एकत्रच राहून त्यांचे जेवण—खाणही एकत्रच होत असे. आण्णांची वसतिगृहे म्हणजे जातीयता निर्मुलन करणाऱ्या कार्यशाळाच होत्या. अशी शेकडो मुले आण्णांनी घडविली व निरनिराळ्या क्षेत्रात ती नावारूपाला आली. त्यापैकीच आमचा हा 'पांडुरंग' म्हणजेच आदरणीय बॅ. पी. जी. पाटील सर होय.

बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांचे वकील राजरत्न माने पाटील हे कवलापूरास येत असत. ते भाऊरावांचे मित्र होते. एकदा त्यांना भेटण्यासाठी इ.स. १९३४ साली कर्मवीर भाऊराव पाटील हे कवलापूरला आले होते. त्यावेळी कर्मवीर आण्णांनी नेहमीच्या सवयीप्रमाणे गोरगरिबांच्या व हुशार मुलांच्या शिक्षणाची चौकशी सुरू केली. त्यावेळी गणपतीमास्तर व आण्णांची भेट झाली. गणपती मास्तरचा हा लहानगा पण चुणचुणीत असलेला पांडुरंग आण्णांच्या नजरेत भरला गेला. याचवेळी या मुलाने

आपले शिक्षक प. वि. चिमगावकर व कुलकर्णी मास्तर यांच्या मदतीने तयार केलेले हस्तलिखीत 'बालतरंग' हे आण्णांच्या पाहण्यात आले. या अंकाचे हस्तलिखित तयार करणारा लेखक व संपादक सहावी इयत्तेत शिकणारा पांडुरंग पाटील आहे. हे समजल्यावर आण्णांना आश्चर्य वाटले. अधिक चौकशी व चिकित्सा केल्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांना या मुलाची हुशारी जाणवली. आण्णांनी या मुलाला पुढील शिक्षणासाठी सातारला नेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे त्यांनी गणपती पाटील यांनी आपली कल्पना बोलून दाखविली. गणपती पाटील यांनाही आणखी एक वर्षानंतर पांडुरंगाच्या माध्यमिक शिक्षणाचा प्रश्न उभा राहणार होता व लांब कुठेतरी ठेवून शिक्षण देण्याचा हा शिक्षण खर्च सोसणे गणपती पाटील यांनाही जमणार नव्हते. त्यामुळे व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास होवून आपलं पोरगंही आपल्यासारखेच मराठी शाळेचा मास्तर होईल. त्याला उच्च शिक्षण घेता येणार नाही. या गोष्टीची जाणीव होऊन त्यांनी कर्मवीर आण्णांच्या कल्पनेला होकार दिला.[१८]

कर्मवीर भाऊराव पाटील हे आपल्या पांडूला शिक्षणासाठी सातारला नेणार आहेत. ही बातमी आऊबाईंना (बॅ. पी. जी. सरांच्या आजींना) व घरातील कुटुंबियांना कळताच सर्वांनी त्याविरूद्ध एकच अकांड—तांडव केले. कारण हा पांडु म्हणजे आऊबाईंचा जीव की प्राण होता. आपली मुलगी वारल्यानंतर तळहातावरील फोडाप्रमाणे या मुलांना आऊबाईंनी सांभाळले होते. पांडुरंग हा तर सर्वांच्या गळ्यातील ताईतच झाला होता. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबरोबर जाण्यासाठी आऊबाई परवागनी देईनात उलट त्यांनी रडून एकच गोंधळ घालण्यास सुरूवात केली. या आठवणी सांगत असताना अनेकवेळा बॅ. पी. जी. पाटीलही हळवे होत असत. सरतेशेवटी कर्मवीरांनी कवलापूरचा दुसरा एक मुलगा सातारला आणण्याचे ठरविले व वेळोवेळी आजीला पांडुरंगाला पाहण्यासाठी कवलापूरला आणले जाईल असे वचन देऊन व आऊबाईंची समजूत काढून पांडुरंग यास सातारा येथे नेण्यासाठी भाऊराव पाटीलांनी

परवानगी मिळविली. दुसऱ्या दिवशी पांडुरंगाला घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील ज्यावेळी सातारला निघाले त्यावेळेस सर्व गावकरी गोळा झाले होते. सर्वांच आवडत पोरगं घेऊन भाऊराव पाटील निघाले. हे पाहून सर्वांना वाईट वाटले. पुढील इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी तो जात आहे हे ऐकून सर्वांना बरेही वाटले. म्हणून यावेळी सर्व गावकऱ्यांनी दोन आणे, चार आणे असे पैसे गोळा करून एकंदर साडेदहा रूपये भाऊराव पाटील यांना दिले. भाऊराव पाटील यांनी पांडुरंग व त्यांचे साहित्य ट्रंक, वळकटी, कंदील बरोबर घेतले आणि सातारला येण्यासाठी 'बुधगाव' रेल्वे स्टेशनकडे निघाले. परंतु या मुलाची शरीरयष्टी किरकोळ असल्यामुळे कवलापूर ते बुधगाव हे अंतर पायी चालणे शक्य नव्हते. म्हणून आण्णांनी त्यांना आपल्या खांद्यावर घेतले व बुधगाव स्टेशनवर पोहोचले तेथून ते रेल्वेने सातारला आले. या कर्मवीरांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील अशी शेकडो मुले आपल्या खांद्यावर घेऊन सातारला वसतिगृहात आणली व त्यांना शिक्षण दिले. या शिक्षण प्रसारामुळेच पुढील काळात महाराष्ट्राचे परिवर्तन घडून आले. बॅ. पी. जी. सर या प्रसंगाची आठवण नेहमी सांगत असत ते म्हणत असत की "कर्मवीर आण्णांच्या खांद्याचा आधार मला मिळाला म्हणूनच मी एवढा मोठा झालो." कर्मवीर आण्णांच्या या भेटीमुळे बॅ. पी. जी. सरांच्या जीवनाला एक वेगळी कलाटणी मिळाली. पुढील काळात त्यांच्या जीवनाचा एक नवा अध्याय सुरू झाला.[१९]

## साताऱ्यातील वास्तव्य व शिक्षण :

पांडुरंग पाटील यांना घेऊन कर्मवीर आण्णा सातारला आल्यानंतर त्यांनी पांडुरंग यास शाहू बोर्डींगमध्ये ठेवले. जेवण–खाण तेथेच होत असे. वसतिगृहात सर्व जातीची मुले होती. ही मुलेच सर्व स्वयंपाक बनवित असत. सर्वजण एकत्रच जेवत असत. भोजनात कसलाही भेदभाव केला जात नसे. पुढील शिक्षण घेण्यासाठी बॅ. पी. जी. पाटील यांना सातारा शहर नगरपालिकेच्या शाळा क्र. तीन मध्ये 'व्हर्नाक्युलर फायनल' (इयत्ता सातवी) च्या वर्गात घालण्यात आले. त्यावेळी या शाळेचे रामचंद्र लक्ष्मण

पन्हाळकर उर्फ जंगम गुरूजी मुख्याध्यापक व वर्गशिक्षक होते. त्यांना या मुलाची हुशारी तात्काळ लक्षात आली ते तत्कालीन आठवणी सांगताना लिहतात "असामान्य बुद्धीमत्ता व जिज्ञासुवृत्ती यांचा अपूर्व संगम मला बॅ. पी. जी. पाटील यांच्यात दिसून आला. शरिराने ते अशक्तच होते. मूर्ती लहान पण बुद्धी मात्र कुशाग्र होती. गणित, भाषा, भूमिती, इतिहास, निबंध या सर्वच विषयात ते तरबेज होते. त्यांना पाहून 'विद्या विनयेन शोभते' याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही." या ठिकाणी या मुलाच्या बुद्धीला आणखी वाव मिळाला. त्याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील स्वत: जातीने ह्या वसतिगृहातील सर्व मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देत असत. पांडुरंग उर्फ बॅ. पी. जी. पाटील यांनीही या परिस्थितीचा उपयोग करून घेऊन अतिशय मन लावून अभ्यास केला. त्या काळात व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा अतिशय महत्त्वपूर्ण मानली जात असे व तिचा निकालही अत्यंत कडक लागत असे. या पार्श्वभूमीवर मुलत: कुशाग्र बुद्धी असलेल्या पांडुरंगने मन लावून अभ्यास केला व ही परीक्षा दिली. १९३५ साली झालेल्या या व्हर्नाक्युलर फायनल परिक्षेचा निकाल केवळ १०% लागला होता. अशा स्थितीत पांडुरंग उर्फ बॅ. पी. जी. पाटील मुंबई इलाख्यात १० जिल्ह्यात पहिले आले. तसेच १९३५ साली झालेल्या हायस्कूल स्कॉलरशीप परिक्षेतही ते पहिले आले.[२०] या घटनेने कर्मवीर आण्णांचा आनंद गगनात मावेना. कवलापूरवरून आणलेल्या या मुलाने आपल्या परिश्रमाचे सार्थक केले असेच आण्णांना वाटून गेले. बॅ. पी. जी. पाटील हे या परिक्षेत पहिले आले ही बातमी गावाकडे कळताच आऊबाईसहीत सर्व गावकऱ्यांना आनंद झाला व पोराने नाव काढले म्हणून सर्व कुटुंबियांना समाधान वाटले.

व्हर्नाक्युलर परीक्षा पास झाल्यानंतर कर्मवीर आण्णांनी बॅ. पी. जी. पाटील यांना जून १९३५ मध्ये सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूल या हायस्कूलमध्ये घातले. आण्णांनी प्रथमपासून बॅ. पी. जी. पाटील यांनी इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास करावा याची काळजी घेतलेली दिसते. इंग्रजी बरोबर भूमिती, अंकगणित हे विषयही त्यांचे चांगले होते. वर्गामध्ये नेहमीच

त्यांचा प्रथम क्रमांक असे. क्रमिक अभ्यासाव्यतिरिक्त निबंध व वक्तृत्त्व स्पर्धेतही ते भाग घेत असत. विशेष म्हणजे इंग्रजी वक्तृत्त्व स्पर्धेतही त्यांनी भाग घेतला होता व अशा अनेक स्पर्धांत त्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला होता. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते १९३५ ते ४० या कालखंडात शिकत होते. जून १९४० मध्ये मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रीक परिक्षेत ते सर्व विषयांत डिस्टिंक्शन मिळवून पास झाले. त्यांना ७७% मार्कस् पडले. ते इंग्रजी विषयात पुणे केंद्रात पहिले आले. यावेळी त्यांना संस्कृतचे 'राजरत्न माने पाटील' पारितोषिक मिळाले, मात्र यावेळी मॅट्रीकमध्ये त्यांचा पहिला क्रमांक थोडक्यात हुकला होता. पण सर्व विषयांना डिस्टिंक्शन मिळाल्यामुळे कर्मवीर आण्णांना खूपच आनंद झाला. या हायस्कूल शिक्षणाच्या काळात बॅ. पी. जी. पाटील यांचा इंग्रजीचा अभ्यास चांगला सुधारण्याची जबाबदारी कर्मवीर आण्णांनी मा. गणी आतार यांच्यावर सोपविली होती. त्यामुळे बॅ. पी. जी. पाटील यांचे इंग्रजी प्रथमपासून चांगले राहिले.[२१]

### महाविद्यालयीन शिक्षणाची सुरूवात व वाटचाल :

बॅ. पी. जी. पाटील मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना कोठे घालावे असा प्रश्न कर्मवीर आण्णांच्या पुढे निर्माण झाला. कारण त्यावेळी सातारला एकही कॉलेज नव्हते. याचवेळी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये इ.स. १९४० मध्ये प्राचार्य गोकाक यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी लंडन येथे इंग्रजी साहित्यावर अभ्यास करून पदवी मिळविली होती. कर्मवीर आण्णा यांनी स्वत: प्राचार्य गोकाक यांची भेट घेऊन बॅ. पी. जी. पाटील यांना विलिंग्डन कॉलेजमध्ये प्रवेश द्यावा व आपण त्यांचे गुरू होऊन बॅ. पी. जीं. च्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे अशी विनंती केली. प्राचार्य गोकाक यांनी ते मान्य केले. बॅ. पी. जी. पाटील यांनी विलिंग्डन कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला. पुढील काळात प्राचार्य गोकाक यांचे ते सर्वात आवडते विद्यार्थी झाले. बॅ. पी. जी. पाटीलही आपल्या जीवनात ज्या चार गुरूंचा उल्लेख करत (चार गुरू म्हणजे God, Gandhiji, Karmaveer Anna and

Gokak) त्यात प्राचार्य गोकाक यांचे नाव आवर्जून घेत असत. विलिंग्डनला असताना ते होस्टेलच्या ६ नंबरच्या खोलीत राहत असत. कर्मवीर आण्णा अधूनमधून बॅ. पी. जी. पाटील यांना भेटावयास आल्यावर याच खोलीत भेटत असत. या खोलीत कॉटवर आऊंनी दिलेली वाकळ व त्यावर घोंगडे हा बिछाना होता. स्वत:चे कपडे ते स्वत: धुवत असत. नीळकंठ गुरूजींनी गावाकडून आणलेली चटणी भाकरी बऱ्याच वेळा या खोलीत बसून खाल्ली जात असे. सकाळचा चहापान नाष्टा या गोष्टी तर त्यांना माहितच नव्हत्या. कारण परदेशात जाईपर्यंत ते चहा देखील पीत नसत.[२२]

विलिंग्डन कॉलेजमध्ये शिकत असताना सांगलीपासून कवलापूर जवळ असल्यामुळे बॅ. पी. जी. पाटील व त्यांचे मित्र जी. डी. पाटील हे आर्जींची (आऊंची) भेट घेण्यासाठी शनिवारी व रविवारी सायकलवरून घरी जात. घरची परिस्थिती गरिबीची होती परंतु त्यांनी जीवनात ज्ञान व गुणवत्ता याच्या आड कधीच गरीबी येऊ दिली नव्हती. कॉलेज शिक्षण घेताना ते अगदी साधा पोषाख (खादीचे कपडे) वापरत होते. आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करून शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करत होते. ते विलिंग्डन कॉलेजमध्ये एक हुशार, अभ्यासू विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. याचवेळी ते इंटर परिक्षेत मुंबई विद्यापीठात, आर्टसच्या वर्गात इंग्रजीत सर्वप्रथम आले तेव्हा त्यांना – 'Hughling Prize' मिळाले होते. त्यावर्षी एकूण चार मुले फर्स्ट क्लासमध्ये आली होती. त्यापैकी बॅ. पी. जी. सर व रिझर्व बँकेचे गव्हर्नर डॉ. आय. जी. पटेल हे होते. त्यावेळी विलिंग्डन कॉलेजमध्ये प्राचार्य असणारे गोकाक हे बॅ. पी. जी. च्या आठवणी सांगताना लिहितात – "मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर पी.जीं. नी विलिंग्डन कॉलेजमध्ये प्रथम प्रवेश घेतला व लवकरच माझ्या लक्षात आले की बॅ. पी. जीं. ना इंग्रजी भाषा व साहित्याविषयी मनापासून प्रेम आहे व त्यांची इंग्रजी शब्द संपत्ती व वाक्यरचना चांगली आहे. बॅ. पी. जी. पाटील  हे एकपाठीच होते. त्यांना विस्मयकारक स्मरणशक्तीची देणगी लाभली होती. निरनिराळ्या पुस्तकातील परिच्छेदच्या परिच्छेद त्यांचे पाठ असत. तसेच विलिंग्डन

कॉलेजमध्ये झालेल्या वक्त्यांची भाषणे जसेच्या तसे शब्दन्‌शब्द म्हणून दाखवत असत. याबाबत बॅ. पी. जीं. ची बरोबरी करणारा एकमेव दुसरा विद्यार्थी होता तो म्हणजे न्यायमूर्ती चंद्रचुड होय. बॅ. पी. जी. हे उत्स्फूर्त वक्ते व वादविवादपटू होते. त्यामुळे विविध स्पर्धामध्ये प्रथम पारितोषिक मिळविणे त्यांना जमत असे. अल्पकाळात ते माझे आवडते विद्यार्थी झाले."[२३]

कॉलेजच्या जीवनात बॅ. पी. जी. पाटील हे प्रथम क्रमांकावर तर असतच परंतु ते विद्यार्थी नेतेही होते. कॉलेजच्या जीवनामध्ये त्यांना नीळकंठ गुरूजी, आण्णासाहेब मुळे, केशव संकपाळ या जुन्या मित्राप्रमाणेच आणखी एन. के. कुलकर्णी, एन. एस. गोरे, एस. जी. कुलकर्णी, व्ही. व्ही. यार्दी, प्रभूदेसाई, काळे इत्यादी अनेक मित्र लाभले. संपूर्ण कॉलेजमध्ये एक हुशार व आदर्श विद्यार्थी म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जात असे. एकदा विलिंग्डनच्या आवारात इंटर कॉलेजिएट स्पोर्टस् स्पर्धा झाल्या. त्यामध्ये कुस्तीत जी. डी. पाटील चॅम्पियन झाले व आयत्या वेळच्या इंग्रजी भाषणात बॅ. पी. जी. पाटील यांनी कॉलेजला ढाल मिळवून दिली. त्यांच्या कॉलेज जीवनातील आठवणी सांगताना प्राध्यापक मालती किर्लोस्कर लिहितात — "बॅ. पी. जी. पाटील हे विलिंग्डनमधील आदर्श विद्यार्थी होते. "एकपाठी" विद्यार्थी म्हणून ते महाविद्यालयात प्रसिद्ध होते. प्राचार्य गोकाक यांची व्याख्यानेही ते जशीच्या तशी म्हणून दाखवत." एक आदर्श विद्यार्थी व पारदर्शक मनाचा माणूस म्हणून प्राचार्य गोकाक व भाऊराव पाटील यांच्या मनात बॅ. पी. जीं. बद्दल प्रेमाचे स्थान होते. व बॅ. पी. जी. सरांची तर कर्मवीर भाऊराव पाटील व प्राचार्य गोकाक ही खरीखुरी दैवते होती. एकंदरीत विलिंग्डन कॉलेजमध्ये बॅ. पी. जी. पाटील हे एक हुशार, अभ्यासू, उच्च नीतिमत्ता असलेले स्वच्छ मनाचे विद्यार्थीप्रिय व शिक्षकप्रिय विद्यार्थी होते. त्यांचे सर्व समकालीन मित्र त्यांच्या विद्वत्तेबद्दल भरभरून बोलत असतात.[२४]

## स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग :

बॅ. पी. जी. पाटील विलिंग्डन महाविद्यालयात असतानाच इ. स. १९४२ मध्ये महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली सर्व भारतभर इंग्रजांच्या विरोधात 'चले जाव' आंदोलन सुरू झाले. 'करेंगे या मरेंगे' अशी निर्णायक भूमिका घेऊन ब्रिटीश राज्यकर्त्यांनी हा देश सोडून चालते व्हा असा इशारा गांधीजींनी दिला होता ८ ऑगस्ट १९४२ रोजी ही चळवळ सुरू झाली. सर्व देशभरातून या चळवळीत हजारो कार्यकर्ते सहभागी झाले. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही या आंदोलनात उड्या घेतल्या. अशा काळातच देशप्रेमाने भारावलेले, गांधीजींच्या विचारांचा प्रभाव असलेले बॅ. पी. जी. पाटील व त्यांचे काही मित्र यांनी आंदोलनात सहभाग घेतला. महात्मा गांधीजींनी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ब्रिटीशांविरोधी आंदोलनाचा भाग म्हणून कॉलेजवर बहिष्कार टाकून ते बंद पाडण्याचे आवाहन केले. त्यामुळे हजारो विद्यार्थी गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आंदोलनात उतरले. विलिंग्डन कॉलेजचे बॅ. पी. जी. पाटील व के. एच. कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्याचे विलिंग्डन कॉलेजमधील युवकांना आवाहन केले. तळपत्या उन्हात बॅ. पी. जी. पाटील व के. एच. कुलकर्णी व काही सहकारी विद्यार्थी विलिंग्डनच्या गेटवर आडवे झोपले. त्यांनी विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये न येता गांधीजींनी पुकारलेल्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यामुळे कॉलेज काही काळ बंद पडले. ९ ऑगस्ट ते २५ सप्टेंबर पर्यंत कॉलेजवर विद्यार्थी हजर नव्हते. त्याचप्रमाणे बॅ. पी. जी. पाटील व त्यांच्या सहकारी मित्रांचे गावोगाव जाऊन ब्रिटीश सरकारविरोधी भाषणे करणे, जनजागृती करणे, निदर्शने करणे हे कार्यक्रम चालूच होते. त्यामुळे पोलीसी यादीत त्यांचे नांव गेले होते. एवढेच नव्हे तर सांगली संस्थानच्या त्या वेळच्या डी. एस.पी.ने ही त्याची दखल घेतली होती. एकदा तर डी.एस.पी. ने पोलीसांमार्फत आम्ही अमुक तारखेस बॅ. पी. जी. पाटलांवर गोळ्या झाडणार आहे असा निरोप कॉलेजवर पाठवला. तो निरोप त्या पोलीस

अधिकाऱ्याने बॅ. पी. जी. पाटील व प्राचार्य गोकाक यांना सांगितला. पण कोणी डगमगले नाही. बॅ. पी. जी. व इतर सत्याग्रही विद्यार्थी हातात तिरंगा घेऊन उभे होते. प्राचार्य गोकाक खादी सूट घालून गेटजवळ उभे होते. बॅ. पी. जी. बरोबर जी. डी. पाटील, के. एच. कुलकर्णी, वासुनाना कुमठेकर, निळकंठ गुरूजी इत्यादी मंडळी एकावर एक गोळी झाडली तर लगेच दुसऱ्याने तिरंगा घ्यायचा या तयारीने उभी होती. परंतु त्या दिवशी डी.एस. पी. आले नाहीत. या आंदोलनात बॅ. पी. जी. पाटील यांचा त्याग फार मोठा होता. कारण त्यांना कॉलेजमध्ये सरकारी स्कॉलरशीप मिळत होती. आंदोलनात भाग घेतल्यामुळे ती बंद पडणार होती शिवाय त्यांच्यावर रीतसर खटला होऊन त्यांना जेलमध्ये टाकण्यात येणार होते.

पुढे २३ सप्टेंबर १९४२ ला अनंत चतुर्थदशीच्या दिवशी बॅ. पी. जी. पाटील व त्यांच्या सहकारी मित्रांना डी.वाय.एस.पी. नलावडे यांनी अटक केली. पुढे त्यांना पुण्याच्या येरवडा कारागृहात ठेवण्यात आले. तेथे ते सेकंड क्लास रेव्हेन्यू नंबर ५९९ या क्रमांकाने ओळखले जात. कॉलेजमधून अटक करून नेत असताना बॅ. पी. जी. पाटील व कुलकर्णी यांनी प्राचार्य गोकाक यांची भेट घेऊन आम्हाला तुरूंगातही वाचण्यासाठी पुस्तके पाठवून द्या, अशी विनंती केली. येरवडा तुरूंगात कर्मवीर आण्णा व प्राचार्य गोकाक यांनी बॅ. पी. जी. पाटील यांना अनेक वेळा पुस्तके नेऊन दिली. सप्टेंबर ते जानेवारी अखेर ते येरवडा तुरूंगात स्थानबद्ध होते. २६ जानेवारी १९४३ ला त्यांची तुरूंगातून सुटका झाली. दीर्घकाळ तुरूंगात गेल्यामुळे पी. जी. पाटील यांचे शैक्षणिक वर्ष बुडाले. या तुरूंगातील आठवणी सांगताना बॅ. पी. जी. पाटील म्हणतात, “तो काळ स्वातंत्र्याने भारावून जाण्याचा होता. तुरूंगात गेल्याचे व शैक्षणिक वर्ष बुडाल्याचे आम्हाला यत्किंचितही वाईट वाटले नाही. उलट अनेक थोर देशभक्त व पुढाऱ्यांचा येरवडा तुरूंगात सहवास लाभला.”

बॅ. पी. जी. पाटील यांच्या कौटुंबिक जीवनात मात्र एक वेगळीच घटना घडली. आपल्या नातवाला तुरूंगवास घडला म्हणून आऊबाई

गोकाक सर व आण्णांच्यावर खुपच रागावल्या होत्या. कारण त्याकाळात तुरूंगवास म्हणजे एक प्रकारची गुन्हेगारीच अशी अडाणी लोकांची समजूत होती. शेवटी प्राचार्य गोकाक यांना मराठी येत नसतानाही कशीबशी आजींची समजूत काढली व मुलगा देशाच्या स्वातंत्र्यासाठी तुरूंगात गेला आहे हे समजावून सांगितले.[२६]

दरम्यानच्या काळात डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संचालक व प्राचार्य गोकाक यांच्यात मतभेद निर्माण झाले. त्यामुळे गोकाक यांनी विलिंग्डनच्या प्राचार्यपदाचा राजीनामा दिला व मे १९४४ मध्ये ते धारवाडला निघून गेले. प्राचार्य गोकाक यांनी विलिंग्डन कॉलेज सोडल्यावर बॅ. पी. जी. पाटील यांनीही विलिंग्डन कॉलेज सोडले. पुढे त्यांनी जून १९४४ मध्ये पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.[२७] त्यामुळे बॅ. पी. जी. पाटील यांना पुण्यास राहणे भाग पडले. या काळातील सर्व खर्च कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सोसलेला आहे. फर्ग्युसन कॉलेजमध्ये बॅ. पी. जी. पाटील यांनी मन लावून अभ्यास केला व बी. ए. ची परीक्षा जून १९४५ मध्ये ऑनर्ससहीत उत्तीर्ण झाले. कम्पलसरी इंग्लिशमध्ये ते मुंबई विद्यापीठात पहिले आले व त्यांना विद्यापीठाचे 'एलिस पारितोषिक' मिळाले. विद्यापीठाच्या स्थापनेपासून हे पारितोषिक मिळविणारे बॅ. पी. जी. पाटील हे बहुजन समाजातील एकमेव विद्यार्थी होते.[२८] बॅ. पी. जी. पाटील यांच्या यशाचा कर्मवीर भाऊराव पाटील यांना अवर्णनीय आनंद झाला. त्यांच्या शिक्षणासाठी घेतलेल्या कष्टाचे चीज झाले.

### उच्च शिक्षणासाठी परदेशी :

बॅ. पी. जी. पाटील यांनी बी. ए. च्या परिक्षेला मिळविलेल्या मोठ्या यशामुळे कर्मवीर आण्णांचा उत्साह चांगलाच वाढला. त्यांच्या डोक्यात बॅ. पी. जी. पाटील यांना पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्याचे विचार सुरू झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अशी अनेक गोरगरीब परंतु हुशार मुले गोळा करून त्यांना उच्च शिक्षणासाठी पदरमोड करून परदेशी पाठविले होते. आण्णांनी त्यांच्या काळात असे एकूण १३

विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठविलेले दिसतात. बॅ. पी. जी. पाटील यांना बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला पाठविण्याचे आण्णांनी ठरविल्यानंतर क्रांतीसिंह नाना पाटील यांनीही या गोष्टीस पाठिंबा दिला. यावेळी कर्मवीर आण्णा व क्रांतीसिंह नाना पाटील यांनी सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातून फिरून पैसा गोळा केला.[२९] यावेळी अनेक गिरणी कामगारांनीही पैसे दिल्याचे दिसते. सर्व गोळा झालेला पैसा २६ जुलै १९४५ रोजी गांधीजींच्या हस्ते बॅ. पी. जी. पाटील यांना देण्यात आला. तेव्हा गांधीजींनी बॅ. पी. जी. ना विचारले की, "बॅरिस्टर होऊन काय करणार?" त्यावेळी बॅ. पी. जी. नी नम्रतेने सांगितले की, "बापूजी मी बॅरिस्टर होऊन परत आल्यावर कोर्टात प्रॅक्टीस करणार नाही तर आण्णांच्या रयत शिक्षण संस्थेत जे लॉ कॉलेज निघेल तेथे शिकविण्याचे काम करीन." यावेळी गांधीजींनी डाव्या हाताने आशिर्वाद दिला व आण्णांच्या संस्थेत आजीव सेवक असताना दोन्ही हाताने आशिर्वाद देईन असे सांगितले"[३०]

१७ सप्टेंबर १९४६ रोजी बॅ. पी. जी. पाटील इंग्लंडला निघाले. यावेळी कर्मवीर आण्णा मुंबईला बोटीवर आले होते. "माझा पांडू बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला निघाला आहे. याचा आण्णांना आनंद होत होता. त्याचबरोबर तो चार – पाच वर्षे आपल्यापासून दूर राहणार यामुळे त्यांच्या जीवाची घालमेल चालू होती. कारण पांडू हा त्यांचा अतिशय लाडका व मुलापेक्षाही प्रिय विद्यार्थी होता. आण्णांनी जाता जाता त्यांच्या पांडूला उपदेश केला की, "जा आणि मन लावून अभ्यास कर. अनेक गरीब लोकांच्या त्यागातून तुझे हे शिक्षण होणार आहे. हे विसरू नकोस. शिक्षण पूर्ण झाल्यावर परत ये आणि माझ्याबरोबर रयतेची सेवा कर. तुला इतर मार्गाने जायचे असेल तरीही माझी हरकत नाही परंतु एक गोष्ट लक्षात ठेव, तु त्या दूरच्या देशात नीट वागला नाहीस तर तुझे आयुष्य दहा वर्षांनी कमी करशील! एवढेच लक्षात ठेव." आण्णांच्या पाया पडून बॅ. पी. जी. पाटील बोटीवर चढले व इंग्लंडला रवाना झाले.[३१]

## परदेशातील वास्तव्य व शिक्षण :

बॅ. पी. जी. पाटील हे इंग्लंडमध्ये १९४६ ते १९५१ अशी पाच वर्षे होते. प्रथम ते किंग्ज कॉलेजमधून अर्थशास्त्र विषय घेऊन बी. ए. ची पदवी लंडन विद्यापीठातून पास झाले. त्यांनी लिंकन्स—इन—लंडन या ठिकाणी बार—ॲट—लॉ च्या शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. त्यांचे शिक्षण चालू असताना त्यांनी जी. डी. पाटील, नाथ पै, पी. टी. पाटील, पारसनीस, कदम हे अनेक भारतीय मित्र त्यांना तेथे भेटले. याकाळात भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होती. २० फेब्रुवारी १९४७ ला भारतीय स्वातंत्र्याचा मसुदा ब्रिटीश पार्लमेंटमध्ये चर्चेला आला. त्यावेळी बॅ. पी. जी. पाटील व त्यांचे मित्र चर्चेच्या वेळी पार्लमेंटमध्ये हजर होते. इंग्लंडमधील मजूर पक्षाला भारतीय स्वातंत्र्याबद्दल सहानुभूती होती. म्हणून इंग्लंडमधील भारतीय तरूणांना मजूर पक्षाबद्दल आपुलकी वाटत असे. मजूर पक्षाच्या काही बैठकांनादेखील बॅ. पी. जी. पाटील हजर राहिले होते. १९५० च्या फेब्रुवारी महिन्यात इंग्लंडमध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या तेव्हा बॅ. पी. जी. पाटील, नाथ पै व जी. डी. पाटील यांनी मजूर पक्षाला पाठिंबा दिलेला दिसतो. याकाळात त्यांना भारताचे इंग्लंडमधील हायकमिशनर कृष्णमेनन यांचे मार्गदर्शन लाभले.[३२]

बार—ॲट—लॉ परिक्षेचा अभ्यास करत असताना त्यांनी इंग्रजी साहित्याचा अभ्यास केला. इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांची भाषणे ऐकली. राज्यशास्त्राचे ज्ञान मिळावे म्हणून ते प्रा. हेराल्ड व जे लास्की यांच्या तासांना बऱ्याच वेळा बसत असत. इंग्रजी साहित्याचे उपासक मिल्टन, शेले, शेक्सपिअर व वर्डस्वर्थ यांच्या स्मृतीस्थळांना त्यांनी भेटी दिल्या.[३३] बार—ॲट—लॉ परीक्षा देऊन ते १९५१ च्या अखेरीस मायदेशी परतले. व २३ जुलै १९५२ रोजी बॅरिस्टर झाल्याची तार त्यांना मिळाली. बॅरिस्टरची परीक्षा पास झाल्यानंतर बॅ. पी. जी. पाटील कवलापूरला गावी गेले. त्यावेळी त्यांच्या सर्व मित्रांना व गावकऱ्यांना आनंद झाला. सर्वांनी त्यांचे स्वागत केले. यावेळेस जुने मित्र मा. सो. कांबळे, रघुनाथ ज्ञानदेव निळकंठ उर्फ निळकंठ गुरूजी इत्यादी सर्व जणांनी बॅ. पी. जी. पाटील यांना

कडकडून अलिंगन दिले. कांबळे नावाच्या मित्राला त्यांनी स्वत:हून अलिंगन दिल्यावर सर्वजण टकमका पाहू लागले. बॅ. पी. जी. पाटील यांनी आपल्या जीवनात कधीही जात—पात पाळली नाही व ही जात त्यांच्या मैत्रीच्याही कधी आड आली नाही. त्याचे हे उत्तम उदाहरण होते.[३४]

बॅ. पी. जी. पाटील यांना बॅरिस्टर पदवी मिळाल्यानंतर त्यांचे वर्गमित्र महेंद्र देसाई यांनी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राकडे काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली होती. परंतु त्या संधीचा विचार न करता ते सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचे ट्यूटर म्हणून १९५२ मध्ये नोकरीस लागले.[३५]

## विवाह व कौटुंबिक जीवन :

बॅ. पी. जी. पाटील यांचे व्यक्तीमत्त्व अतिशय प्रभावी होते. मध्यम उंची, नाजूक शरीरयष्टी, गोरापान रंग, धारदार नाक, सडपातळ व चुणचुणीत बांधा पाहताक्षणीच मनावर सात्त्विक परिणाम व्हावा असा तेज:पुंज चेहरा, असे प्रसन्न व्यक्तीमत्त्व त्यांना लाभले होते. विद्यार्थीदशेपासूनच त्यांचा पोषाख अतिशय साधा परंतु स्वच्छ आणि नीटनेटका असे. खादीचा सुट, खादीचा मॅनेला व कोट असा पोषाख असे. खुप मोठी विद्वत्ता असूनही त्यांचा स्वभाव विनयशील होता. त्यांच्या स्वभावाप्रमाणेच पुढील आयुष्यात त्यांना साजेशी अशी पत्नीही मिळाली त्या म्हणजे आदरणीय सौ. सुमतीबाई पाटील होय.

सौ. सुमतीबाई पांडुरंग पाटील यांचा जन्म २४ जुलै १९३१ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव डॉ. कॅ. शं. ग. चव्हाण व आईचे नांव सुशीलाबाई असे होते. त्यांना जयसिंह व विजयसिंह असे दोन बंधू होते.[३६] एका श्रीमंत व सुखवस्तू घराण्यात त्यांचे बालपण गेले होते. बॅ. पी. जी. सरांच्या प्रमाणेच त्याही प्रथमपासून अतिशय हुशार होत्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथील पूर्वीचे मॉडेल हायस्कूल येथे व माध्यमिक शिक्षण महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूलमध्ये झाले. त्यांचा वर्गात नेहमीच पहिला नंबर असे. हायस्कूलमध्ये शिकत असताना

त्यांना 'प्रिन्सेस पद्माराजे स्कॉलरशीप व लेडी जानकीबाई सबनीस स्कॉलरशीप' मिळाली होती. घरामध्ये त्या सर्वांच्या लाडक्या होत्या. राहायला बंगला, घरात मोटारगाडी व ऐश्वर्य असूनही त्या अतिशय सुसंस्कृ-त, विनयशील व साध्या पद्धतीने राहत असत. त्या अभ्यासात जशा हुशार होत्या. तशा खेळातही भाग घेत असत. खो—खो च्या कॉलेज टीममधून त्या खेळल्या होत्या. त्याचप्रमाणे टेबलटेनीस व बॅडमिंटनपटू म्हणून त्या गाजल्या होत्या. १९४८ साली एस. एस. सी. परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनी कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेतला.[३७] कॉलेज जीवनामध्येही प्रथम क्रमांक त्यांनी कधी सोडला नाही. त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आप्पासाहेब पवार हे होते. सौ. सुमतीबाईंना इंग्रजी शिकविण्यासाठी प्रा. गोकाक हे होते. तेच पुढे राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. योगायोगाची गोष्ट म्हणजे बॅ. पी. जी. पाटील व सौ. सुमतीबाई पाटील या दोघांनाही कॉलेजच्या जीवनात गुरूवर्य म्हणून प्राचार्य गोकाक हे लाभले होते. इ.स. १९४२ साली गोकाक विलिंग्डन येथे प्राचार्य असताना बॅ. पी. जी. पाटील हे विद्यार्थी होते. हेच गोकाक पुन्हा राजाराम कॉलेजचे प्राचार्य झालेले दिसतात. प्राचार्य गोकाक यांनी बॅ. पी. जी. पाटील व सौ. सुमतीबाई पाटील यांचे लग्न जमविण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. १९५२ साली सुमतीबाई बी.ए. ला असतानाच त्यांनी बॅ. पी. जी. पाटील यांना सुमतीबाईबद्दल विचारणा केली. इ.स. १९५२ मध्ये राजाराम कॉलेजमधून ७०% मार्क्स मिळवून त्या बी. ए. ची परीक्षा पास झाल्या. बी. ए. ला चांगले मार्क्स मिळाल्यामुळे त्यांना 'कँडी फेलोशीप' मिळाली.[३८] बी. ए. झाल्यानंतर त्यांनी इंग्रजी विषय घेऊन एम. ए. करण्याचे ठरविले. याचकाळात प्राचार्य गोकाक यांनी पुढाकार घेऊन बॅ. पी. जी. पाटील व सुमतीबाई पाटील यांचे लग्न जुळविण्याच्या दृष्टीने हालचाली केल्या. त्यांनी कॅप्टन चव्हाण व भाऊराव पाटील यांना त्या दृष्टीने सांगितले. या दोघांच्याबद्दल प्राचार्य गोकाक आपल्या लेखात लिहितात "सुमतीबाई चव्हाणांची कुशाग्र बुद्धीमत्ता, साधे राहणीमान आणि

शुद्ध चारित्र्य यामुळे मी खुपच प्रभावीत झालो होतो. व माझ्या मनात विचार येत की बॅ. पी. जी. व सुमतीबाईंची जोडी उत्तम जमेल. कारण दोघांनाही इंग्रजी भाषा व साहित्याविषयी उत्कट प्रेम होते. दोघांची राहणी, साधी, सरळ होती आणि त्याला उदात्त चारित्र्याची जोड होती. त्यामुळे हा जोडा योग्य वाटत होता."[३९] गोकाक यांच्या प्रयत्नांना यश येऊन चव्हाण कुटुंबियांनी या लग्नाला मान्यता दिली. कर्मवीर आण्णांनी हा विवाह अगदी साध्या पद्धतीने सातारा येथे धनिणीच्या बागेत ११ डिसेंबर १९५२ रोजी विवाह घडवून आणला. बॅ. पी. जी. पाटील यांनीही डामडौल न दाखवता आण्णांच्या विचारसरणीनुसार व आण्णांच्या साक्षीनेच सुमतीबाईंशी विवाह केला.[४०] खऱ्या अर्थाने आण्णांचे मानसपुत्र असेच त्यांचे हे वर्तन होते.

बॅ. पी. जी. पाटील यांना याकाळात अनेक मोठमोठ्या नोकऱ्या चालून येत होत्या. परंतु त्यांचा त्यांनी स्वीकार केला नाही. आण्णांच्या रयत शिक्षण संस्थेत राहूनच शिक्षण प्रसाराचे कार्य करावयाचे असा त्यांनी निश्चय केला व त्याप्रमाणे त्यांनी व त्यांच्या पत्नी सौ. सुमतीबाई यांनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षण प्रसाराचे कार्य केले. बॅरिस्टर झालेल्या या माणसाने अवघ्या १२० रूपयांवर शिवाजी कॉलेजमध्ये ट्यूटर म्हणून नोकरी स्वीकारली. एवढेच नव्हे तर आपल्या पत्नीलाही त्यांनी तेथेच प्राध्यापक म्हणून काम करावयास लावले. मिळणारा सर्व पगार ते कधी घेत नसत. आपल्या गरजेपुरते पैसे घेऊन उरलेले सर्व पैसे ते लक्ष्मीबाई फंडाला देत असत व अनेक गरजू व गरीब विद्यार्थ्यांना मदत करत असत. लग्न झाल्यानंतर ऐश्वर्याची व सुखाची स्वप्ने न पाहता, साताऱ्यातच संस्थेच्या कार्यभूमीत, सदरबझार भागातील कल्याणी बरॅक्समधील दोन खोल्यांमध्ये त्यांचा संसार सुरू झाला. सौ. सुमतीबाई यांनाही पुर्वीच्या गर्भश्रीमंतीची ओढ किंवा हव्यास नव्हता. त्यामुळे त्या बॅ. पी. जी. पाटील यांच्याबरोबर आण्णांनी स्वीकारलेल्या कार्यात सहभागी झाल्या.[४१]

विवाहानंतर दोन वर्षांनी १९५४ झाली बॅ. पी. जी. पाटील व सुमती पाटील हे दोघेही पुणे विद्यापीठाच्या एम. ए. परीक्षेला इंग्रजी विषय

घेऊन बसले. या परिक्षेत बॅ. पी. जी. सर हे पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाने व सौ. सुमतीबाई ह्या दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. यावरून दोघांच्याही बुद्धीमत्तेची आपणाला जाणीव होते. शिवाजी कॉलेज येथे दोघांचेही अध्यापनाचे कार्य चालू असताना जवळजवळ १९५३ ते १९६३ अशी दहा वर्षे ते कल्याणी बरॅक्समध्ये राहायला होते. पुढे त्यांनी इ.स. १९६३ साली स्वत:चे घर बांधले व तेथे राहावयास गेले. या घराला नावही त्यांनी 'कर्मवीर छाया' असेच दिले.[४२]

घरातील जीवनावश्यक वस्तुंची खरेदी सौ. सुमतीबाईच करत त्या जरी श्रीमंत घराण्यात वाढल्या असल्या तरी त्यांना गरिबांबद्दल अतिशय कणव होती. सासरी गेल्यांनतर त्या सर्वांशी आदराने वागत. त्यांचा स्वभाव विनयशील होता. सौ. सुमतीबाईंचा पोषाख साधी साडी—चोळी असा होता. डोक्यावरील पदर कधीच बाजूला पडत नसे असे त्यांचे राहणीमान अतिशय साधेच होते. मात्र त्यांनी प्राध्यापक ते प्राचार्य व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्षपद भुषविले. या उभयतांचा संसार अगदी आनंदात चालला होता. बॅ. पी. जी. सर आपल्या पत्नीबद्दल लिहितात "सौ. सुमतीबाईंचे चिंतन व विचार सुस्पष्ट, तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ व व्यवहारी निकषांवर उतरणारे असतात. याचा प्रत्यय मला अनेक वेळा आला आहे. म्हणूनच ती माझी 'संरक्षक देवता' आहे."[४३]

बॅ. पी. जी. सरांच्या कौटुंबिक जीवनात खंत वाटणारी एकच बाब असावी ती म्हणजे त्यांना मुलबाळ नव्हते. तरीही आपल्या संसारिक जीवनात या उणिवेकडे लक्ष न देता सर्व रयतेची मुले हीच आपली मुले समजली. आण्णांनी सुरू केलेले 'शाहू बोर्डिंग' व 'कमवा व शिका' योजनेतील मुले स्वत:ची समजून त्यांच्यावर अतोनात प्रेम केले. 'कमवा व शिका' मधील एक विद्यार्थी प्रभाकर लांडगे म्हणतात, "मला बॅ. पी. जी. सरांनी व मॅडमनी त्यांच्या घरातीलच व्यक्ती म्हणून सांभाळले. त्यामुळेच बी.एड., एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण होऊन मला नोकरी लागली."[४४]

आपल्या कुटुंबाविषयीचे प्रेम व कर्तव्य म्हणून भावाचा मुलगा व बहिणींनाही मदत केली. सर्व कुटुंबीय त्यांचे कार्य पाहून आनंदित होत. उभयतांनी एकमेकांना आदर व आधार देऊन आपले शैक्षणिक कार्य निस्वार्थपणे पार पाडले. आपल्या कौटुंबिक जीवनात चैनीच्या वस्तुंचा मोह न धरता, नवनवीन पुस्तके खरेदी करणे व विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची भूक भागविण्याचे कार्य केले.

बॅ. पी. जी. सर हे दीर्घोद्योगी होते. सतत कामात राहणे हा त्यांचा स्वभाव होता. देवावर त्यांची श्रद्धा होती. चैत्राच्या महिन्यात गावी सिद्धेश्वराची यात्रा भरत असे. ते यात्रेला आवर्जुन उपस्थित राहत. त्यांचे धार्मिक ग्रंथ, साहित्य, इतिहास अशा विषयांचे वाचन होते. आपल्या नोकरीबाबत ते अगदी वक्तशीर होते. कामाच्या बाबतीत त्यांना कसलाही चुकारपणा व हयगय आवडत नसे. या उभयतांनी आपल्या मृत्युनंतर आपली सर्व संपत्ती व वास्तूसुद्धा शैक्षणिक कार्य, समाज प्रबोधन व ज्ञानार्जनासाठी उपयोगी यावी म्हणून मृत्युपत्र तयार करून ठेवले होते.

**परीक्षण :**

बॅ. पी. जी. पाटील यांच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर त्यांचे जीवन म्हणजेच एक आदर्श शिक्षक, कुशल प्रशासक, सामाजिक कार्य करणारा समाजसेवक असे दिसते. १९५२ साली बॅरिस्टर होऊन आल्यानंतर मुंबईला हायकोर्टात वकिली करण्याऐवजी किंवा एखाद्या अधिकार पदावर जाऊन प्रचंड पैसा मिळविण्याऐवजी या रयतेच्या 'बॅरिस्टर' ने कर्मवीर आण्णांनी शिकविलेल्या तत्त्वांना प्रमाणभूत मानले. त्यांनी रयत शिक्षण संस्थेत गोरगरिबांच्या मुलांना शिकविण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्च केले. त्यांना पत्नीही तशीच लाभली. पुणे विद्यापीठामध्ये पती पहिल्या क्रमांकाने पास तर पत्नी दुसऱ्या क्रमांकाने पास असा हा योगायोग एखाद्या जोडप्याच्याच वाट्याला येत असतो. दोघेही पती—पत्नी ज्ञानसमृद्ध होते व ते ज्ञान त्यांनी बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना मुक्तहस्ते वाटले. रयत शिक्षण संस्थेतील मुले हीच त्यांची मुले होती. या मुलातच ते मनापासून रमले.

त्यांच्या हाताखाली ज्ञान घेतलेले हे विद्यार्थी आज महाराष्ट्रभर मोठमोठ्या पदावर आहेत.

रयत शिक्षण संस्था हेच या पती—पत्नीचे कुटुंब होते. रयत शिक्षण संस्थेचा हा वटवृक्ष विशाल करण्यासाठी ते प्रामाणिकपणे अखेरपर्यंत धडपडले. त्यांनी वैयक्तिक कुटुंबात भौतिक सुखाचा हव्यास व उपभोग कधीही केला नाही. त्यांच्या घरी गेल्यानंतर आधुनिक फर्निचर व वैभवाचा कधीही डामडौल दिसला नाही. घरात स्वच्छता, साधेपणा व सात्विकतेचे वातावरण भरलेले असे. या दोघांच्या अस्तित्वामुळे घर भरल्यासारखे वाटे. शेकडो विद्यार्थ्यांशी बॅ. पी. जी. सरांचे पितृत्वासमान नाते जडलेले होते. अनेक विद्यार्थी विद्यार्थीदशेपासून अगदी नोकरी, लग्न होईपर्यंत ते सरांच्या घरी येत जात व मार्गदर्शन घेत असत. अशा शेकडो विद्यार्थ्यांचे बौद्धिक, प्रापंचिक व भावनिक नाते या उभयतांशी जडले होते.

म. फुले यांचे तत्वाज्ञान, छत्रपती शाहू महाराज यांचा आदर्श, भाऊराव पाटील यांचे सान्निध्य व आदर्श कार्य आणि महात्मा गांधींचे आशिर्वाद या आधारावरच बॅ. पी. जी. सरांचे कार्य चालले होते. स्वत:चा प्रपंच सर्वस्व न मानता. त्यांनी आयुष्यभर बहुजन समाजाच्या उन्नतीचे स्वप्न बघितले व त्या दृष्टीने प्रयत्न केले. आपण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचे वारसदार व त्यांचे मानसपुत्र आहोत हे त्यांनी कृतीने सिद्ध केले.

**संदर्भ व तळटीपा :**

१. नरके हरि (संपा) 'महात्मा फुले गौरव ग्रंथ' के. जोशी एस. एम. समग्र क्रांतीचा उद्गाता, महात्मा फुले पृष्ठ क्र. ४९, प्रकाशक महाराष्ट्र शासन समिती २००६

२. डॉ. मंगुडकर मा. प. "महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ" जोशी – लोखंडे प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र. ३ व ४

३. कीर धनंजय 'लोकमान्य टिळक, राजर्षि शाहू महाराज एक मुल्यमापन' श्री गजानन बुक डेपो मुंबई, पृष्ठ क्र. ६५

४. कित्ता – पृष्ठ क्र. ९०, ९१

५. डॉ. वैद्य सुमन व डॉ. कोठेकर शांता "आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ – १८५७)" पृष्ठ क्र. २५४, २४७

६. ग्रोवर बी. एल. 'आधुनिक भारताचा इतिहास एक मुल्यांकन' पृष्ठ क्र. ३०५, ३०७

७. बॅ. पाटील पी. जी. 'कर्मवीरोपनिषद' (प्रस्तावना), पृष्ठ क्र. २, ३

८. मगदूम आ. भा., काटकर मा. भी., पंडित व. वा. (संपा) 'कर्मवीर' प्रकाशक वर्ष – १९९६, पृष्ठ क्र. ९१, ९९

९. मंचरकर र. बा. (संपा) 'चरित्रे आणि चारित्र्ये' पृष्ठ क्र. १४

१०. ठोके बा. म., 'मला समजलेले कर्मवीर भाऊराव पाटील' प्रस्तावना

११. काटकर मा. भी. तत्रैव, पृष्ठ क्र. ४९ – ५०

१२. बॅ. पी. जी. पाटील यांच्या कुटूंबीय मंडळींनी सांगितलेली माहिती – कवलापूर

१३. डॉ. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' लेख नीळकंठ गुरूजी 'पांडुरंग – माझा बालपणीचा सवंगडी' पृष्ठ क्र. ३ – ४, १९८२

१४. कित्ता – पृष्ठ क्र. ४ – ५

१५. कित्ता – पृष्ठ क्र. ४ – ८

१६. कित्ता – कांबळे मा. सो. 'बाळ पांडुरंग' पृष्ठ क्र. १, २

१७. कित्ता – पृष्ठ क्र. ४

१८. कित्ता — पृष्ठ क्र. १० — ११

१९. बॅ. पाटील पी. जी. यांच्या व्याख्यानातून आलेली माहिती.

२०. डॉ. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' ले पन्हाळकर रामचंद्र लक्ष्मण उर्फ जंगम गुरूजी "गुरू : शिष्यात पराजयेत" पृष्ठ क्र. १५ — १६

२१. प्राचार्य रा. तु. भगत (संपा) 'ज्ञानयोगी बॅ. पी. जी. पाटील' परिशिष्ट एक, पृष्ठ क्र. ७३९, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर २००६

२२. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' लेखक स्वामी एम. एम. "बॅ. पी. जीं. ची श्रद्धास्थाने" पृष्ठ क्र. २३

२३. भगत रा. तु. (संपा) "ज्ञानयोगी बॅ. पी. जी. पाटील" लेखक, प्राचार्य व्ही. के. गोकाक "बॅ. पी. जी. पाटील आणि सौ. सुमतीबाई" पृष्ठ क्र. ४७२ — ७३

२४. कित्ता — ले. मालती किर्लोस्कर पृष्ठ क्र. ४९४

२५. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' लेखक नीळकंठ गुरूजी — 'पांडुरंग माझा बालपणीचा सवंगडी' पृष्ठ क्र. ६

२६. कित्ता — पृष्ठ क्र. ७

२७. कित्ता — लेखक डॉ. ग. वि. कुलकर्णी लेख 'माझे क्लासमेट' पृष्ठ क्र. १२७

२८. कित्ता — लेखक निळकंठ गुरूजी, तत्रैव, पृष्ठ क्र. ७

२९. शेख एम. ए. (संपा), 'त्रिदल', पृष्ठ क्र. १२.

३०. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' लेखक न्या. कुसुम वेल्हाळ — बॅ. पी. जी. पाटील एक स्वप्न सहल, पृष्ठ क्र. १३

३१. बॅ. पाटील पी. जी. कर्मवीरोपनिषद, पृष्ठ क्र. ६३, ६४.

३२. बॅ. जी. डी. पाटील स्मृती विशेषांक — लेखक बॅ. पाटील पी. जी., पृष्ठ क्र. ३९, ४०

३३. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' प्राचार्य म. म. स्वामी लेख — 'बॅ. पी. जीं. ची श्रद्धास्थाने' पृष्ठ क्र. ३४

३४. कित्ता — कांबळे मा. सो., लेख — 'माझा बाळपणीचा सवंगडी' पृष्ठ क्र. २

३५. मंतरलेले दिवस — पाटील के. व्ही. यांचा लेख

३६. 'उदयंती' डॉ. माळी शिवराम (संपा) छायाचित्रातील माहितीवरून

३७. कित्ता — दिनकर द. पाटील लेख — 'मिश्र महाविद्यालयाच्या पहिल्या प्राचार्या', पृष्ठ क्र. ५६

३८. कित्ता — बॅ. पाटील पी. जी. — एकोणतीस वर्षाची साथ, पृष्ठ क्र. ३५६

३९. भगत रा. तु. (संपा) 'ज्ञानयोगी बॅ. पी. जी. पाटील', पृष्ठ क्र. ४७६

४०. लग्नपत्रिका — बॅ. पी. जी. पाटील व सौ. सुमतीबाई यांची

४१. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' बॅ. पाटील पी. जी. लेख — 'एकोणतीस वर्षाची साथ', पृष्ठ क्र. ३४९

४२. कित्ता — प्रभाकर लांडगे लेख — 'आहेर', पृष्ठ क्र. ८४

४३. कित्ता — बॅ. पाटील पी. जी. लेख — 'एकोणतीस वर्षाची साथ', पृष्ठ क्र. ३७७

४४. कित्ता — प्रभाकर लांडगे लेख — 'आहेर', पृष्ठ क्र. ८५